# प्रेसनोट

दि.२८/०९/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पारनेर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | भाऊसाहेब गोविंद पगारे, वय ४४ वर्षे, सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं. भाळवणी सेक्शन, ता.पारनेर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ५,०००/– तडजोडीअंती रुपये ४,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी व त्यांचे मित्र यांनी जामगाव येथे एकत्रित पोल्ट्री व्यवसाय सुरु केला आहे. त्यांनी सदर ठिकाणी विद्युत जोडणी घेणेकरीता फेब्रुवारी २०२० मध्ये ऑनलाईन कोटेशन भरलेले आहे व आवश्यक ती फि चलनाने भरली आहे. त्यांनतर तक्रारदार यांनी भाळवणी येथील महावितरण कार्यालयात विद्युत जोडणी व मीटर देणे करीता आरोपी लोकसेवक यांची वेळोवळी भेट घेऊन विनंती केली. परंतु त्यांनी मीटर उपलब्ध नसलेचे सांगुन टाळाटाळ केली. आज दि.२८/९/२०२० रोजी तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांची भेट घेतली असता आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचेकडे मिटर देणे करीता ५०००/–रु मागणी केली. तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक यांस लाच देण्याची इच्छा नसलेने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांचेकडे दिलेल्या तक्रारीवरुन केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ५०००/– रुपयांची मागणी करुन तडजोडी अंती ४०००/– रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झालेवरुन आज रोजी महावितरण कार्यालय भाळवणी येथे आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक पगारे यांनी तक्रारदार यांचेकडुन ४०००/– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००


28/09

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर